# अहवाल व विशेष कामगिरी



२००८-२००९

वरिष्ठ महाविद्यालय अहवाल समिती
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे
प्रा. साहेबराव गायकवाड

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान
महाविद्यालय, अकोले
ता. अकोले, जि. अहमदनगर

# वार्षिक अहवाल

२००९-१०

विद्यार्थी मंडळ

अध्यक्ष

**प्रा. यासीन सय्यद**

पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार दि. २९ ऑगस्ट २००९ रोजी विद्यार्थी मंडळाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून कु. सविता जगन्नाथ शिंदे (एम.एस्सी), लेडीज रिप्रेझेंटेटीव्ह म्हणून कु.शिल्पा काशिनाथ घनकुटे व कु. छाया भागवत चव्हाण, एन.सी.सी. प्रतिनिधी म्हणून श्री.शेख तौसिफ रफिक, जिमखाना प्रतिनिधी म्हणून कु.नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब, कला मंडळ प्रतिनिधी म्हणून कु.घोडके प्रियांका बाळासाहेब या सर्वांची निवड मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत करण्यात आली.

दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना,इतर लोकांना, आजारी व्यक्तींना मदत करण्याच्या आमच्या अनेक वर्षांच्या परंपरेला या वर्षी अधिक उन्नत स्वरूप या निमित्ताने प्राप्त झाले असून, जवळ जवळ १२,२५१/- रुपयांची मदत करण्यात आली.

गुरूवार दि. २६/१/२००९ रोजी 'शहीद स्मृती' समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी स्मारकास तालुक्याचे आमदार मा. श्री. मधुकररावजी पिचड साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या शुभहस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. मेजर प्रा.भानुदास शिंदे व एन.सी.सी. छात्र यांनी शहिदांना सलामी व मानवंदना दिली.

अवकाळी पावसाच्या पुरात अडकलेल्या पंधरा लोकांचे प्राण वाचविण्याच्या शौर्याबद्दल आम्लेश्वर विद्यालय, आंभोळ येथील कर्मचारी श्री.होनाजी भागाजी बाजे यांना याप्रसंगी मा. आमदार मधुकररावजी पिचड सो. यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अ.ता.ए. सोसायटीचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

१ जानेवारी २०१० रोजी 'साडी डे', ४ जानेवारी पारंपरिक वेशभूषा दिवस, ५ जानेवारी रोजी 'व्हाईट डे', ७ जानेवारी रोजी 'पिंक डे', ८ जानेवारी रोजी 'कॅप डे', ९ जानेवारी रोजी 'मिसमॅच डे' साजरे करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

***

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

शारीरिक शिक्षण संचालक

**प्रा. शिवनाथ दिघे**

क्रीडा विभाग समितीचे अध्यक्ष प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व संयोजक / कार्यकारी अध्यक्ष प्रा.शिवनाथ दिघे यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांना सदस्य म्हणून प्रा.डॉ.एस. बी.खेमनर, प्रा.एस. ए. पाळंदे, प्रा.के.बी. नाईकवाडी यांनी तसेच विद्यार्थी / विद्यार्थिनी क्रीडा प्रतिनिधी कु.उज्वला भाऊसाहेब नाईकवाडीने वर्षभर सहकार्य केले.

**१) नेटबॉल :**

पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे दिनांक २५ ते २६ सप्टेंबर २००९ रोजी झालेल्या नेटबॉल (मुले) स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या १२ खेळाडूंचा संघ सहभागी झाला होता. या संघाचा कर्णधार म्हणून श्री.पवार अरूण रामकृष्ण याची निवड करण्यात आली होती. तसेच नेट बॉल (मुली) चा १२ खेळाडूंचा संघ देखील सहभागी झाला होता. कर्णधार म्हणून कु.नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली होती.

**२) हॅण्डबॉल :**

२५, २६ ऑक्टोबर २००९ रोजी आपल्या महाविद्यालयात आयोजित केलेल्या हॅण्डबॉल (मुले) स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या १२ खेळाडूंचा संघ सहभागी झाला होता. या संघाचा कर्णधार श्री.कोळपकर गणेश

पांडुरंग याची निवड करण्यात आली. तसेच हॅण्डबॉल (मुली) १२ खेळाडूंचा संघ देखील सहभागी झाला होता. या संघाची कर्णधार म्हणून कु.वाळुंज सोनाली अशोक या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.

**४) पोहणे :**

पी.व्ही. पी. महाविद्यालय, प्रवरानगर येथे १४ सप्टेंबर २००९ रोजी झालेल्या पोहणे स्पर्धेत सहभागी विद्यार्थी १) श्री.मेमाणे मयूर विश्वास, २) श्री.नवले प्रशांत भाऊसाहेब, ३) श्री.पथवे गणपत यादव, ४) श्री.फोडसे कुंडलिक किसन.

**५) बुध्दीबळ :**

राजूर महाविद्यालय, राजूर येथे ६ ते ८ सप्टेंबर २००९ रोजी झालेल्या बुध्दीबळ स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे कु.नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब, श्री.पाटील राहुल सुभाष, श्री.बगाड नवनाथ धावजी व श्री.मुंडे दत्तात्रय मारुती या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**६) मल्लखांब व रोप मल्लखांब :**

पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर येथे ०६ नोव्हेंबर २००९ रोजी झालेल्या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचे श्री.पारधी कुंडलिक चिंधु व कु.वैद्य ज्योती कैलास या खेळाडूंनी सहभाग घेतला. उपरोक्त खेळांमध्ये खालीलप्रमाणे आपल्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नैपुण्य मिळविले. त्यांची अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाच्या संघामध्ये पुणे विद्यापीठ पातळीवरील आंतरविभागीय स्पर्धांसाठी निवड झाली होती.

**नेटबॉल मुले :**

१० ते ११ ऑक्टोबर २००९ रोजी मॉडर्न कॉलेज, पुणे येथे श्री.पवार रामकृष्ण अरूण या खेळाडूची निवड झाली.

**नेटबॉल मुली :**

आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, चाकण दिनांक ८ ते ९ ऑक्टोबर २००९ कु. सोनाली अशोक वाळुंज व कु. नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब.

**हॅण्डबॉल मुले :**

फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे दिनांक १० ते ११ ऑक्टोबर २००९ श्री.कोळपकर गणेश पांडुरंग, श्री. सुरपुरिया तुषार अजित, श्री.वाकचौरे स्वप्नील अशोक, श्री. शेटे समीर सुखदेव, श्री.राजगुरू अविनाश भरत, श्री.दिवटे निखिल राजेंद्र, श्री.वाघमारे विनोद विजयकुमार तसेच दिनांक ८ ते ९ ऑटोबर २००९ रोजी फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे मुली कु.वाळुंज सोनाली अशोक, कु.नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब, कु.वाळुंज अर्चना संपत, कु. कदम पूनम चंद्रकांत, कु.कर्जेल सारिका मच्छिंद्र व कु.कपिले वृषाली नंदकिशोर.

**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धा**

नागार्जुन (आं.प्र.) साठी कु. सोनाली भाऊसाहेब वाळुंज हिची पुणे विद्यापीठाच्या हॅण्डबॉल संघात निवड झालेली आहे.

**बास्केटबॉल (मुली) :**

न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर दि. १२ ऑक्टोबर २००९ खेळाडू - कु.सोनाली अशोक वाळुंज.

**पोहणे :**

दिनांक २० सप्टेंबर २००९ रोजी नाशिक येथे खेळाडू श्री. पथवे अशोक संतु व श्री. फोडसे कुंडलिक किसन.

**मल्लखांब व रोप मल्लखांब :**

पी.व्ही.पी. प्रवरानगर येथे दि. १८ नोव्हेंबर २००९ रोजी श्री.पारधी कुंडलिक चिंधू व कु.वैद्य ज्योती कैलास तसेच महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी खालील खेळाडूंची निवड.

**१) नेटबॉल (राज्यस्तर)**

जालना येथे झालेल्या नेटबॉल स्पर्धेमध्ये श्री. सुरपुरिया तुषार अजित, श्री. दिवटे निखिल राजेंद्र व श्री. डावरे संदीप यांची अहमदनगर संघातून निवड झाली.

**२) हॅण्डबॉल (राज्यस्तर)**

लातूर येथे झालेल्या हॅण्डबॉल स्पर्धेमध्ये श्री. पवार रामकृष्ण अरुण, श्री.डावरे संदीप व श्री.गडाख उदय राजाराम यांची अहमदनगर जिल्हा संघातून निवड झाली. तसेच मुंबई येथे झालेल्या स्पर्धेत कु.नाईकवाडी उज्वला भाऊसाहेब, अहमदनगर जिल्हा संघामध्ये निवड झाली.

**७) वार्षिक क्रीडा स्पर्धा :**

दिनांक ५ ते १५ जानेवारी २०१० या कालावधीत सकाळी ११ ते १ व दुपारी ४ ते ७ या वेळेत कबड्डी, खो-खो, हॅण्डबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, कुस्ती व मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धांचे संचलन प्रा. शिवनाथ दिघे, प्रा. नंदलाल काळन व प्रा. योगेश उगले यांनी केले.

## राष्ट्रीय छात्र सेना (एन्.सी.सी.)

### मेजर प्रा. भानुदास शिंदे

अहवाल वर्षातील राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व, सहभागी प्रशिक्षण, कॅम्प्स् व विविध उपक्रम पाहता आपल्या महाविद्यालयातील एन.सी.सी. युनिट एक चांगले युनिट असल्याचे दिसून येते.

**१) नियुक्ती :**

शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये खालील छात्रांच्या पुढीलप्रमाणे नेमणूक करण्यात आल्या.

१. अंडर ऑफिसर - श्री.राजे इफ्तेकार अली

२. एन.सी.सी. प्रतिनिधी विद्यार्थी मंडळ - वरिष्ठ महाविद्यालय-श्री. शेख तौसिफ

**२) राष्ट्रीय ध्वजारोहण समारंभ :**

स्वातंत्र्य व प्रजासत्ताक दिनी मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व अ.ता. ए. सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. जे.डी. आंबरे पाटील यांचे हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

**३) 'बी' आणि 'सी' परीक्षा :**

अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथे झालेल्या 'बी य प्रमाणपत्र परीक्षेस बसलेले ११ कॅडेटस् उत्तीर्ण झाले.

**४) अन्य कॅम्पमधील सहभाग व उल्लेखनीय यश :**

**अ)** दिनांक ११ मे ते २२ मे २००९ या कालावधीत पाचगणी, महाबळेश्वर येथे झालेल्या 'नॅशनल इंटीग्रेशन कॅम्प' मध्ये सार्जंट श्री.जाधव संदीप व कार्पोरल श्री.शेळके भगवान हे दोन छात्र सहभागी झाले होते.

**ब)** दिनांक १ जून ते १० जून २००९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या 'ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प' मध्ये अंडर ऑफिसर श्री. राजे इफ्तेकार अली व कार्पोरल श्री.कवडे सुनील हे दोन छात्र सहभागी झाले होते.

**क)** दिनांक १ जून ते १० जून २००९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या 'ए.सी.एम.' कॅम्पमध्ये अंडर ऑफिसर राजे इफ्तेकार अली व कार्पोरल श्री. कवडे सुनील या छात्रांनी सहभाग घेतला व महामहिम राज्यपाल मा. श्री.जमीर साहेब यांना मानवंदना देऊन शानदार संचलन आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

**ड)** दिनांक ११ जुलै ते २० जुलै २००९ या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या 'थल सैनिक कॅम्प' मध्ये कार्पोरल श्री.शेख तौसिफ, कार्पोरल श्री.तोडकर शंकर, कार्पोरल श्री.मडके भाऊसाहेब व सार्जंट श्री.पांडे विवेक या छात्रांनी सहभाग घेतला.

**इ)** दिनांक २८ ऑगस्ट ते ०६ सप्टेंबर या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या 'ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प'मध्ये आपल्या महाविद्यालयाच्या एकूण १५ छात्रांनी ५७महाराष्ट्र बटालियन, अहमदनगर तर्फे सहभाग घेतला.

**ई)** दिनांक १३ ऑक्टोबर २००९ रोजी झालेल्या तहसील कार्यालय, अकोले येथे महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूकीसाठी 'स्पेशल पोलिस ड्युटी' म्हणून श्री.शेख तौसिफ, श्री.तोडकर अशोक, श्री.दातखिळे रवींद्र, श्री. मडके भाऊसाहेब, श्री.वाघमारे विनोद या छात्रांनी सहभाग घेऊन राष्ट्रीय कार्य पूर्ण केले.

**फ)** दिनांक ०३ ते १२ नोव्हेंबर या काळात मेहराबाद, अहमदनगर येथे ५७ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अहमदनगर आयोजित 'ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प' मध्ये आपल्या महाविद्यालयाचे एकूण १८ छात्र सहभागी झाले होते. या प्रसंगी कर्नल श्री.एस.पी. भोसले (एस.एम. सेना मंडल) ग्रुप कमांडर औरंगाबाद यांच्या भेटीप्रसंगी 'सन्मानगार्ड' परेडमध्ये श्री.दातखिळे रवींद्र, श्री.पांडे

विवेक व श्री.नाईकवाडी प्रवीण यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदविला.

**प)** दिनांक ०८ डिसेंबर २००९ ते १७ डिसेंबर २००९ या कालावधीत बी.एड. कॉलेज लोणी (प्रवरानगर) येथे ५७ महाराष्ट्र बटालियन एन्.सी.सी. अहमदनगर तर्फे घेण्यात आलेल्या 'ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प'मध्ये स्वतः मेजर भानुदास शिंदे व २१ छात्रांनी सहभाग घेतला व त्यावेळी -

१. श्री.आवारी ज्ञानदेव - ६ कि.मी. क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग.

२. जाधव महेश- ६ कि मी. क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग.

३. श्री.वाकचौरे संतोष - ६ किमी क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग

४. श्री.चव्हाण शरद - २२ रायफल नेमबाजीत सहभाग.

५. श्री.वाकचौरे प्रवीण- २२ रायफल नेमबाजीत सहभाग.

६. श्री.शेख तौसिफ- बेस्ट पायलट

७. श्री.मडके भाऊसाहेब - बेस्ट पायलट.

**ट)** दिनांक १५ ते २९ डिसेंबर २००९ या कालावधीत एम.आय.आर.सी. सेंटर सोलापूर रोड, अहमदनगर येथे एसीसी कॅम्पमध्ये आपल्या महाविद्यालयातील चार छात्र सैनिकांनी सहभाग घेतला. तसेच एसीसीमधील विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

१. श्री.राजे इफ्तेकार अली -ड्रील कॉम्पेरिशन- प्रथम क्र. सुवर्णपदक

२. श्री.दातखिळे रवींद्र - ड्रील कॉम्पेरिझन- द्वितीय क्रमांक

३. श्री.राजे इफ्तेकार अली - रिटन टेस्ट - प्रथम क्रमांक सुवर्णपदक.

**विशेष उल्लेखनीयः**

**ठ) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण-** दिनांक ०९ ते २० जून २००९ रोजी औरंगाबाद येथे आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरात श्री. राजे इफ्तेकार अली व श्री. कवडे सुनील यांनी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.

**ढ) रक्तदान :**

'रक्तदान- श्रेष्ठ दान' ही मानवी कर्तव्याची जाणीव ठेवून, सैनिक प्रशिक्षण चालू असताना कॅम्पमध्ये श्री. राजे इफ्तेकार अली, श्री. तोडकर शंकर व श्री. कासार विवेक यांनी रक्तदान केले.

**ण) भारतीय सेना दलात दाखल :**

आपल्या महाविद्यालयातील एन.सी.सी. छात्र श्री.कोटकर रेवननाथ भाऊसाहेब व श्री.भुसारी मगर या दोन्ही छात्र भारतीय सेना दलात दाखल होऊन इतर छात्रांसाठी एक प्रोत्साहन व आदर्श निर्माण केला आहे. मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे व मेजर शिंदे यांचे अभिनंदन केले.

***

## राष्ट्रीय सेवा योजना (एन्.एस्.एस्.)

कार्यक्रम अधिकारी

**प्रा.यासीन सय्यद**

खरा भारत खेड्यात आहे. खेड्याकडे चला ! या महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा घेऊन गेली ४० वर्षेसातत्याने राष्ट्रीय सेवा योजना 'दत्तक गाव' घेऊन देशातील ग्रामीण विकासास भरीव मदत करीत आहे. भारत देश खेड्यात वसलेला असून, प्रगतीच्या वाटा शहरापासून खेड्यापर्यंत पोहचविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पुढाकार घेऊन काम करीत आहेत.

**१. उद्घाटन व नियमित कार्यक्रम :**

**अ)** २८ ऑगस्ट २००९ रोजी प्रा. अभिमन्यू केदार यांच्या हस्ते या योजनेच्या नियमित कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. सन २००९-१० पासून ३०० विद्यार्थ्यांच्या एककास मान्यता मिळाली असून, १३५ मुले व १६५ मुली आहेत.

**ब)** २९ व ३० ऑगस्ट २००९ रोजी प्रा.अभिमन्यू केदार व प्रा.यासीन सय्यद यांनी स्वयंसेवकांना उद्बोधित केले.

**क)** ३ सप्टेंबर २००९ रोजी माहिती तंत्रज्ञान विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने १०५० गणेशमूर्तींचे दान स्वीकारले व योग्य ठिकाणी विसर्जन करण्यात आले.

**ड)** दिनांक ३०/०८/२००९ रोजी जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांची मिटींग महाविद्यालयात आयोजित करण्यात आली.

**इ)** दिनांक ५ सप्टेंबर शिक्षकदिन, ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन, दिनांक १६ सप्टेंबर २००९ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

## २) विशेष शिबीरे :

**अ)** २४ सप्टेंबर २००९ हा दिवस 'राष्ट्रीय सेवा योजना' दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रा. डॉ. दत्तात्रय गंधारे यांचे 'माहितीचा अधिकार' व यशदाचे प्रा. संदीप फापाळे यांचे व्याख्यान झाले.

**ब)** २ ऑक्टोबर गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. प्रा. डॉ. विजय भगत, प्रा. किरण जाधव यांचे 'ग्लोबल वॉर्मिंग' याविषयावर मार्गदर्शन झाले.

**क)** १ डिसेंबर जागतिक एडस् दिनानिमित्त प्रा. केशवराव नाईकवाडी यांचे व्याख्यान व भित्तीपत्रकाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

## ३) हिवाळी शिबीर :

(२० डिसेंबर ते २६ डिसेंबर ) वाघापूर येथे घेण्यात आलेल्या या शिबीरात १५० स्वयंसेवक व ५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. शिबीर कालावधीत स्वयंसेवकांनी आऊबाई मंदिर ते मन्याळे घाट हा ४ किमीचा रस्ता दुरूस्त केला. ग्रामस्वच्छता, ऊर्जा बचत, जनजागृती, आर्थिक सर्वेक्षण, माती परीक्षण, रक्तगट तपासणी, आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर कामाचे मूल्य अंदाजे रु. ९०,००० /- आहे.

अहमदनगर जिल्हापरिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. सिताराम देशमुख यांच्या शुभहस्ते व अ.ता.ए. सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी. आंबरे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उद्घाटन २० डिसेंबर२००९ रोजी झाले. या प्रसंगी मा.श्री.सुरेशरातव कोते साहेब, लिज्जत पापड, पुणे, अकोले महाविद्यालयाचे प्राचार्य मा.रमेशचंद्र खांडगे, कोतूळ महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.बाबासाहेब देशमुख, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे संचालक मा. श्री.निवृत्ती दादा साबळे, मा.श्री. भाऊसाहेब बराते, सरपंच, वाघापूर, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव डॉ.डी.के. सहाणे, खजिनदार मा. ॲड.के.बी. हांडे व ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबीर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, कोतूळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाबासाहेब देशमुख, कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद, प्रा.अभिमन्यू केदार, प्रा.सुरेश मालुंजकर, प्रा.भानुदास खताळ, प्रा.कु. श्वेताराणी नेल्लोरे, श्री.बाळासाहेब अस्वले, श्री.रोहिदास चव्हाण, श्री. वसंत जेडगुले, श्री. विजय पवार, कु. वर्षा भालेराव, कु. उज्ज्वला नाईकवाडी, श्री. स्वप्नील करवा, श्री.आशिष ढगे, कोतूळ महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी, सर्व स्वयंसेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## ४) युवा सप्ताह :

दिनांक १२ ते १९ जानेवारी २०१० या कालावधीत युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. निबंध, गायन व वाद-विवाद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

## ५) कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सहभाग व निवड :

**१)** ४ व ५ जुलै २००९ 'माहितीचा अधिकार' या विषयावर 'यशदा' पुणे येथे कार्यशाळेत सहभाग व प्रा. यासीन सय्यद यांची व्याख्याता म्हणून निवड.

**२)** ६ सप्टेंबर २००९ रोजी प्रा. सुरेश मालुंजकर यांची जिल्हा समन्वयक म्हणून निवड.

**३)** ७ सप्टेंबर २००९ रोजी संगमनेर कॉलेज येथील नियमित कार्यक्रम उद्घाटन समारंभास प्रा. सुरेश मालुंजकर व प्रा. यासीन सय्यद यांचा सहभाग.

**४)** १७ नोव्हेंबर २००९ पुणे विद्यापीठ विशेष हिवाळी शिबीर बैठकीत प्रा. सुरेश मालुंजकर व प्रा. यासीन सय्यद यांचा सहभाग.

५) ५ डिसेंबर २००९ संगमनेर महाविद्यालयात शिबीर नियोजन बैठकीत प्रा. भानुदास खताळ यांचा सहभाग.

## ६) विद्यार्थी व स्वयंसेवकांचा सहभाग :

**अ)** दिनांक ५/९/२००९ ते ९/९/२००९ अहमदनगर येथील स्नेहालय युवक छावणी शिबीरामध्ये कु. भालेराव वर्षा मारूती व कु. देशमुख शुभांगी कैलास सहभागी झाले.

**ब)** दिनांक १५/०९/२००९ ते १९/१२/२००९ एन.आर.डी. परेडसाठी नागपूर येथे श्री. भांगरे गणेश लक्ष्मण याची निवड.

**क)** दिनांक १८/१२/२००९ ते १९/१२/२००९ स्नेहालय अहमदनगर येथील श्रमसंस्कार शिबीरात कु. कोटकर स्वाती तुकाराम व कु. सावंत वर्षा बबन यांचा सहभाग.

**ड)** १ ते ४ डिसेंबर राज्यस्तरीय पूर्व प्रजासत्ताक दिन संचलन निवड, मलसोदरी महाविद्यालय, जालना कु. भावना बुळे.

**इ)** दिनांक ८/११/०९ ते १४/११/०९ रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी-विद्यापीठस्तरीय शिबीरामध्ये श्री. नवले मंगेश नानासाहेब याचा सहभाग.

**ई)** २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २००९ जिल्हास्तरीय कार्यशाळा, बारामती श्री. वाकचौरे सुधीर नामदेव याचा सहभाग.

**फ)** २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २००९ चोंडी ता. जामखेड येथे राज्यस्तरीय महिला सबलीकरण शिबीरात कु. घोडके प्रियांका बाळासाहेब व कु. देशमुख शुभांगी कैलास यांचा सहभाग.

**ग)** १ डिसेंबर २००९ ते ८ डिसेंबर २००९ राळेगण सिध्दी येथे विद्यापीठ स्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीरात श्री. पवार विजय नारायण व कु. म्हशाळ रेखा रामदास यांचा सहभाग.

**घ)** १७ जून ते ३ जुलै २००९ पुणे ते पंढरपूर ऊर्जा दिंडीत सहभाग. कु. घोडके प्रियंका बाळासाहेब, कु. वजे वनिता भानुदास, कु. भालेराव वर्षा मारूती, श्री. गडाख प्रशांत बाळकृष्ण, श्री. पारधी कुंडलिक चिंधू.

**च)** १५ मे ते २२ मे २००९ आनंदवन येथे सहभाग- श्री.स्वप्निल रामनाथ करवा, श्री.राहुल बाबासाहेब वाकचौरे, श्री.अरूण रामकृष्ण पवार, कु.वर्षा मारूती भालेराव, कु.दीपाली भरत शिंदे, कु.संगिता काशिनाथ मालुंजकर, कु.कविता बापुसाहेब ससे, मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शनानुसार कार्यक्रम अधिकारी प्रा.अभिमन्यू केदार, प्रा.सुरेश मालुंजकर, प्रा. भानुदास खताळ, प्रा. कु.श्वेताराणी नेल्लोरे, एन.एस.एस. प्रतिनिधी कु. वर्षा भालेराव, श्री.स्वप्निल करवा, श्री.विजय पवार, श्री.आशिष ढगे, कु.उज्वला नाईकवाडी, कर्मचारी श्री.बाळासाहेब अस्वले, श्री.वसंत जेडगुले, यांचे सहकार्य कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद यांना लाभले.

## कला मंडळ

अध्यक्ष

**प्रा. महेंद्र बाणाईत**

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात कला मंडळातर्फे मराठी, हिंदी गीतगायन, अभिनय स्पर्धा घेण्यात आल्या. २६ जानेवारी २०१० रोजी पारंपरिक वेशभूषा केलेल्या कलाकारांची रॅली आयोजित करण्यात आली. स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शन व तीन अंकी नाटक 'घर तिघांचे असावं' (लेखक- रत्नाकर मतकरी) सादर करण्यात आले. वरील सर्व कार्यक्रमांसाठी प्रा.साहेबराव गायकवाड, प्रा.सौ.रंजना कदम, प्रा.कु.श्वेता नेल्लोरे यांनी परिश्रम घेतले.

## वादविवाद मंडळ

अध्यक्ष

**डॉ. विजय भगत**

दिनांक ०७/०१/२०१० रोजी वाद विवाद मंडळाच्या वतीने महाविद्यालयात वार्षिक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

## सामाजिक समता मंडळ

अध्यक्ष

### प्रा. बाळासाहेब मेहेत्रे

सामाजिक समता मंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रसिध्द गझलकार व लोकमतच्या पुणे आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री.प्रदीप निफाडकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी 'सामाजिक समता' या विषयावर निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. सदर उपक्रम राबविण्यासाठी प्रा.कु.अनुजा आरोटे यांचे सहकार्य लाभले आहे.

## विज्ञान मंडळ

अध्यक्ष

### प्रा.भांगरे बी.के.

नाशिक येथील के.टी.एच्.एम्. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड, अधिष्ठाता, विज्ञान शाखा, पुणे विद्यापीठ यांच्या शुभहस्ते १२/१०/२००९ रोजी विज्ञान मंडळाचे उद्घाटन झाले. विज्ञान मंडळाच्या वतीने निबंध स्पर्धा, टॅलेंट टेस्ट व व्यक्तिमत्त्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले.

दि. २३ डिसेंबर २००९ ते ६ जानेवारी २०१० या कालावधीत 'व्यक्तिमत्त्व विकास' कार्यक्रम घेण्यात आला. सदर शिबिरात ४० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

## दलित वस्ती सुधार योजना

आयोजक

### प्रा.साहेबराव गायकवाड

अकोले महाविद्यालयाच्या वतीने अकोले (इंदिरानगर) दलितवस्ती सुधारात्मक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या वर्षी खादी ग्रामोद्योग, आण्णाभाऊ साठे महामंडळ व दारिद्र्यरेषेखालील तरूणांना उद्योगासाठी अर्थसहाय्य अशा विविध योजनांतर्गत एकूण रूपये एक लाख तीस हजारांचे कर्ज प्राप्त करून देण्यात आले.

## मागासवर्गीय विद्यार्थी मैत्री संघ

संयोजक

### प्रा.साहेबराव गायकवाड

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी अहमदनगर यांचे आदेशानुसार मागासवर्गीय विद्यार्थी मैत्री संघ स्थापन करण्यात आला असून, सरकारच्याविविध योजना व शिष्यवृत्तीसंबंधी माहिती त्यांच्यापर्यंत पोहचवावी यासाठी पाच प्राध्यापकांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली.

दि. १०/०१/२०१० रोजी सकाळी ११ वाजता मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 'मैत्री संघा'संदर्भात माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी प्रा.एस. एम. सोनवणे, प्रा. सोपान साळवे, प्रा.राहूल वाघमारे, प्रा. रंजना कदम यांचे सहकार्य लाभले.

## वाणिज्य मंडळ

अध्यक्ष

### प्रा.रामकृष्ण देशमुख

दिनांक २२ ऑगस्ट २००९ रोजी नाशिक येथील सनदी लेखापाल मा. श्री. एस.वाय. मणियार यांच्या अध्यक्षतेखाली व मा. श्री. उल्हास बोरसे यांच्या शुभहस्ते वाणिज्य मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. तसेच य वर्षी कॉमर्स फेस्टिवलचे फेब्रुवारी महिन्यात आयोजन करण्यात आले.

## कमवा व शिका योजना

कार्यक्रम अधिकारी

### प्रा.सोपान साळवे

विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत 'कमवा व शिका' योजना यशस्वीरित्या कार्यरत असून, या वर्षी योजनेनुसार पुढील कामे करण्यात आली. परिसर स्वच्छता, झाडांची लागवड, खड्डे खोदकाम, झाडांना पाणी देणे, ग्रंथालयातील कामे, कार्यालयीन कामे, मैदानाची निगा.या योजनेअंतर्गत एकूण २६ हजार ३०० रूपये मेहनताना म्हणून गरीब

विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. या कामी डॉ.अविनाश झांबरे, प्रा.राहुल वाघमारे यांचे सहकार्य लाभले.

## सेवा योजन विभाग

अध्यक्ष

**प्रा. भांगरे बी.के.**

सन २०९-१० या शैक्षणिक वर्षात सर्व विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन योजना राबविण्यात आली. इयत्ता बारावीनंतर पुढे काय? विविध क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांची माहिती इत्यादींबाबत चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नोकरी व्यवसायाच्या बाबतीत आलेल्या जाहिराती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे आदी काम करण्यात आले.

## आरोग्य सेवा योजना

संयोजक

**प्रा.के.बी.नाईकवाडी**

विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेच्या वतीने खालील उपक्रम राबविण्यात आले.

१. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान, बी.बी.ए., बी.सी.एस., बी.सी.ए. या वर्गाच्या विद्यार्थी- विद्यार्थिनींना सक्तीची आरोग्य तपासणी करण्यात आली.

२. आरोग्य शिक्षण कार्यक्रमाअंतर्गत मुले व मुलींसाठी स्वतंत्ररित्या 'वयात येताना' हा व्याख्यान स्लाईड शो व प्रश्नोत्तर असा कार्यक्रम महिला मंडळ, श्रीरामपूरच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत घेण्यात आला.

३. रक्तगट व रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्यातून २७ रक्त पिशव्या जमा करण्यात आले.

४. आरोग्य प्रबोधनासाठी 'स्वाईन फ्ल्यू' व एडस् पोस्टर्स प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थी स्टाफसाठी डॉ.सतीश खताळ यांच्या सहकार्याने आरोग्य सेवा देण्यात आली.

या कामी केदार अभिमन्यू, प्रा.अशपाक पठाण, प्रा. सौ. रंजना कदम तसेच प्रा.यासीन सय्यद यांचे सहकार्य लाभले.

## विवेकवाहिनी

कार्याध्यक्ष

**प्रा.भानुदास खताळ**

'आपला विकास आपल्याहाती, हक्क हवेतच पण कर्तव्य आधी' या ध्येयानुसार करार करणाऱ्या विवेकवाहिनीमध्ये या शैक्षणिक वर्षात विवेक वाहकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. दिनांक १६/०९/२००९ रोजी उद्घाटन करून विद्यार्थ्यांनीच साप्ताहिक बैठकीचे स्थान व वेळ निश्चित केले. या वर्षात झालेल्या बैठकांमध्ये आहार, विषय व दृष्टीकोन, व्यायाम, व्यसनमुक्ती स्त्री पुरूष समानता, लैंगिक शिक्षण, दहशतवाद, अंधश्रध्दा या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करून पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. या उपक्रमांसाठी प्रा.किरण जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

## सामाजिक सेवा क्षेत्र

अध्यक्ष

**डॉ.विजय भगत**

सामाजिक सेवा क्षेत्र विभागाच्या वतीने दिनांक ०६/०१/२०१० रोजी अकोले येथील शाहूनगर व इंदिरानगर येथे स्वच्छता मोहिम राबविली. तसेच स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले.

या कार्यात प्रा. सचिन पलांडे व प्रा. सौ. सय्यद यांनी योगदान दिले.

## विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार

चेअरमन

**प्रा.सुरेश मालुंजकर**

सन १९७७ पासून अकोले कॉलेज विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार महाविद्यालयात चालविले जात आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा सर्व शैक्षणिक साहित्य व सामग्रीची माफक दराने विक्री केली जाते.

या संस्थेचे कामकाज/ व्यवस्थापन सहकारी कायद्यानुसार केले जाते. चेअरमन प्रा. सुरेश मालुंजकर,

व्हाईस चेअरमन श्री. चंद्रभान ढवळे, सेक्रेटरी श्री. बापुसाहेब आवारी व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनानुसार सेल्समन श्री. कुंडलिक पारधी या भांडाराचे दैनंदिन कामकाज करीत आहेत.

## व्यक्तिमत्त्व विकास केंद्र

समन्वयक

**प्रा.अशोक दातीर**

पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार कार्यरत असलेले व्यतिमत्त्व विकास केंद्र विद्यार्थ्यांमध्ये 'सॉफ्ट स्किलचा विकास' करते.

या अहवाल वर्षात दिनांक ३०/०९/२००९ रोजी पुणे येथील 'फ्रँकलिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग'चे मा. प्रा. एजाज सय्यद व मा. प्रा. वसीम सय्यद यांनी केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिला पोलिस उपनिरीक्षक या पदाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कु. वृषाली धनंजय शेटे, कु.मनिषा वसंत घोडके, कु.प्रणिती दिनकर जगताप या विद्यार्थिनींना मुलाखतीचे मार्गदर्शन करण्यात आले.

सदर उपक्रम राबविण्यासाठी सहकारी प्रा.किरण जाधव, डॉ. विजय भगत व प्रा. सोपान साळवे यांनी सहकार्य केले.

## सहल विभाग

प्रमुख

**प्रा.डॉ.खेमनर बी.एस.**

या वर्षात विविध शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले. एम्.ए. भूगोल, एस्.वाय.टी. वाय (भूगोल स्पेशल) विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल साम्रद, घाटघर, कोल्हापूर, महाबळेश्वर येथे नेण्यात आली. बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस्.या वर्गांची सहल कोकणात नेण्यात आली.

## प्राध्यापक प्रबोधिनी

अध्यक्ष

**प्रा.डॉ.सौ.अकीला शेख**

द्वितीय सत्रात 'वाङमय मंडळाचे' वतीने काव्य लेखन, काव्यवाचन, कथा लेखन, सुंदर हस्ताक्षर लेखन व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. वाङमय मंडळाचे सदस्य प्रा. सोपान साळवे यांनी सहकार्य केले.

## प्राणायाम व योग

अध्यक्ष

**प्रा.एस. के. मालुंजकर**

सन २००९-१० मध्ये अकोले तालुका पतंजली योग समिती व रा.से.यो. अकोले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०८/०१/२०१० ते १२/०१/२०१० या कालावधीत फक्त महिलांसाठी प्राणायाम व योग शिबिरामध्ये एकूण ७२ महिलांनी प्रशिक्षण घेतले. सौ. अनिता देशमुख व सौ.रजनी मालुंजकर यांनी प्रशिक्षण दिले.

## विद्यार्थिनी मंच

अध्यक्षा

**प्रा.सौ.रंजना कदम**

दि. २ नोव्हेंबर २००९ रोजी विद्यार्थिनी मंचचे उद्घाटन मा. सौ.मीनाबाई जगधने, सदस्या, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था यांच्या हस्ते करण्यात आले.

१५ जानेवारी २०१० रोजी मा.प्रा. सौ. स्मिता गुणे यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यान दिले. या उपक्रमासाठी प्रा.डॉ.अकीला शेख, प्रा.श्वेता नेल्लोरे, प्रा.सौ. सय्यद, प्रा.यासीन सय्यद व डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे सहकार्य लाभले.

## बहिःशाल शिक्षण मंडळ

केंद्र कार्यवाह

### प्रा.केदार अभिमन्यू

बहिःशाल शिक्षण मंडळातर्फे दि. २२/१२/२००९ ते २४/१२/२००९ या कालावधीसाठी डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन, वाघापूर येथे करण्यात आले. २२/१२/२००९ रोजी डॉ.रसाळ आर.जी. यांचे 'इस्त्रायली शेती' या विषयावर २३/१२/२००९ रोजी मा. प्रा. वसंत शेडगे यांनी 'ज्ञानेश्वरांची शिकवण' या विषयावर २४/१२/२००९ रोजी मा.प्रा.बाबा खरात यांनी लोकरंजनातून लोकशिक्षण या विषयावर व्याख्यान दिले. तसेच दि. ६ जानेवारी २०१० रोजी ज्येष्ठ नागरिकांचे शिबिर आयोजित करण्यात आले. त्यात ६० ज्येष्ठ नागरिक व १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर उपक्रम सफल करण्यासाठी प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शन व प्रा. खताळ, प्रा. यासीन सय्यद यांचे सहकार्य लाभले.

## परिसर विकास

अध्यक्ष

### प्रा.बी.के. भांगरे

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात परिसर विकास समितीमार्फत अनेक प्रकारचे उपक्रम घेण्यात आले. वृक्षारोपण, रोपांची लागवड, झाडांची निगा, पाणी देणे, यासारखी कामे करण्यात आली. 'निर्मल महाविद्यालय' पुरस्कारासाठी जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून परिक्षण करण्यात आले. या कामी परिसर विकास समिती सदस्य व सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## विद्यार्थी कल्याण मंडळ

विद्यार्थी कल्याण अधिकारी

### प्रा.डॉ.अविनाश झांबरे

विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने विविध योजना महाविद्यालयात राबविण्यात आल्या. कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' या योजनेमध्ये एकूण ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांनी एकूण रूपये २७,६८०/- धनादेशाद्वारे रक्कम अदा केली.

गुरूवार दिनांक १४/०१/२०१० रोजी विद्यार्थिनींसाठी 'विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास' कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत एकूण ६३ मुलींनी सहभाग घेतला.

**१.** दिनांक ७ व ८ सप्टेंबर २००९रोजी सप्तश्रृंगी गड वणी (नांदुरी) येथे 'आदिवासी विकास स्पर्धा' परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये श्री. अर्जुन मेंगाळ व श्री. गणपत पथवे या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**२.** दिनांक ७/११/२००९ रोजी पुणे विद्यापीठ येथे डॉ.पी.सी. अलेक्झांडर मराठी/इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. वाकचौरे पूनम बाळासाहेब या विद्यार्थीनीने सहभाग घेतला.

**३.** दि. ५ ते ९ नोव्हेंबर २००९ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवक महोत्सवात कु.प्रियांका घोडके व कु.वर्षा फटांगरे व श्री. गणेश भांगरे यांनी सहभाग घेतला.

**४.** दिनांक ११ व १२ डिसेंबर २००९ रोजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार येथे आयोजित जिल्हास्तरीय गिर्यारोहण शिबिरात श्री.जाधव संदीप सुधाकर याने सहभाग घेतला.

**५.** दि. २७ व २८ डिसेंबर २००९ रोजी बी.डी. काळे महाविद्यालयात आयोजित विद्यापीठ प्रतिनिधी कार्यशाळेत कु.सविता जगन्नाथ शिंदे ही विद्यार्थिनी सहभागी झाली.

**६.** दि. ०२/०१/२०१० रोजी पुणे विद्यापीठ १०३ व्या पदवी प्रदान समारंभात कु.सविता जगन्नाथ शिंदे व श्री. पवार संतोष हे विद्यार्थी सहभागी झाले.

**७.** रविवार दिनांक ०७ जानेवारी २०१० रोजी ॲड.एम्.एन्.देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजूर आयोजित 'निर्भय कन्या अभियान' शिबीरासाठी आपल्या महाविद्यालयातील १६ विद्यार्थी सहभागी झाले.

❊ पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण योजनेंतर्गत आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थिनींसाठी एकूण रु.१०,६००/- अनुदान विद्यापीठाकडून मिळाले.

* क्रांती ज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती सन २००९-१० या वर्षासाठी बिगर व्यावसायिक अभ्याक्रमाचे पदवीचे १० व पदव्युत्तर ०५ असे एकूण १५ आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाचे एकूण ०९ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठांला सादर करण्यात आले, त्याचे एकूण रु.१२,०००/- अनुदान विद्यापीठाकडून मिळाले.

पुणे विद्यापीठाच्या हिरक महोत्सवानिमित्त जिल्हा स्तरीय सुगम व समूह गायन स्पर्धेचे दि.३.२.२००९ रोजी आयोजन करण्यांत आले. मा.प्राचार्यांच्या हस्ते यशस्वी स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिस प्रदान करण्यांत आले.

## आविष्कार

समन्वयक

**प्रा.किरण जाधव**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधकीय वृत्ती जोपासण्यासाठी बी.सी.यु. डी. पुणे विद्यापीठ व अमृतवाहिनी कॉलेज ऑफ फार्मसी, संगमनेर, जि.अहमदनगर येथे दिनांक २२ डिसेंबर २००९ रोजी आयोजित केलेल्या आविष्कार २००९ च्या जिल्हास्तरीय स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

१) श्री. भोजने आशिष गणपत- Fruits in the Wilderness : Aotential of local food Resource.

२) श्री. जाधव संदीप सुधाकर- Survey of Untaped Bio-otent Plants from Akole region as a source of Food for 21st century.

३) श्री. भांगरे गणेश लक्ष्मण- Wind Power Determination from Newly designed wind mill.

४) श्री. खरात योगेश ज्ञानदेव व कु.घाटकर शिल्पा सुनील - Efficient use of Excel and MS word for Z.P. School Information Management in rural area.

५) श्री. सलीम लतीफ शेख व श्री. अजित नारायण वाकचौरे- K Village : Dhamangaon Pat.

या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. बी.एस. देशमुख, प्रा. अशोक दातीर, प्रा. किरण जाधव, प्रा. डॉ. विजय भगत यांचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हास्तरीय स्पर्धेत वरील क्र. १ व २ या प्रकल्पांनी अनुक्रमे द्वितीय क्रमांक मिळवून दि. ३० डिसेंबर २००९ रोजी झालेल्या विद्यापीठ फेरीत प्रवेश मिळविला.

## संगणक व व्यवस्थापन शास्त्र विभाग

प्रमुख

**प्रा.काशीनाथ गुंजाळ**

या वर्षी एफ्.वाय.बी.सी.ए., बी.बी.ए., बी.सी.एस्; या वर्गातील नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी द्वितीय व तृतीय वर्ष बी.सी.ए. वर्गातील विद्यार्थ्यांनी विशेष कार्यक्रम आयोजित केला.

प्रथम सत्राच्या शेवटी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या एम.पी.एस.सी/ यु.पी.एस.सी. तसेच व्यक्तिमत्त्व विकास या विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

## स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन

समन्वयक

**प्रा.किरण जाधव**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, पोलिस मुख्य परीक्षेमध्ये (२००७) आपल्या महाविद्यालयातील

१.कु. मनिषा घोडके (एम.ए.) व

२. माजी विद्यार्थिनी कु.प्रणिता जगताप यांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी सुरेखा लोंढे सहाय्यक विक्रीकर उपनिरीक्षक पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाली.

विद्यार्थ्यांना पदवीनंतरचे विविध अभ्यासक्रम व स्पर्धा परीक्षेबाबत माहिती करून देण्याचे काम सदर

## हिंदी विभाग

अध्यक्षा

### प्रा.डॉ.सौ.अकीला शेख

हिंदी विभागाच्या वतीने दरवर्षी 'हिंदी दिवस समारोह' आयोजित केला जातो. या वर्षी हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी श्री. अमित घोडके यांच्या उपस्थितीत हा समारोह साजरा झाला. हिंदी विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा घेण्यात आली. एम.ए. हिंदी विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रमावर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हिंदी पत्रकारिता, अनुवाद कला व जाहिरात कला यासारख्या नवीन क्षेत्रांत नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या जाहिराती व माहितीचे पोस्टर्स ग्रंथालयाच्या काचफलकावर लावण्यात आलेले आहेत.

एम.ए. वर्गासाठी अभ्यागत व्याख्याता म्हणून बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेरच्या प्रा. डॉ. सौ. माधवी रूपवाल यांचे तसेच महाविद्यालयातील प्रा. साहेबराव गायकवाड, प्रा. देवीदास चौधरी, प्रा.कु.कल्पना शिंदे व प्रा.अमित घोडके यांचे सहकार्य लाभले.

## राज्यशास्त्र

विभागप्रमुख

### प्रा.अभिमन्यू केदार

शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरू करण्यात आला आहे. या वर्षी एकूण ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. 'स्त्रीवाद' या विषयावर एक दिवशीय चर्चासत्र फेब्रुवारी २०१० मध्ये आयोजित केले गेले. विभागातील प्राध्यापक, प्रा. यासीन सय्यद व प्रा. अतुल वैद्य यांचे उत्साहपूर्ण सहकार्याने हा विभाग कार्यरत आहे.

## भूगोल विज्ञान

विभागप्रमुख

### प्रा.डॉ.शिवाजी खेमनर

भूगोल विभागातील एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मवेशी, वाशेरे, देवठाण या गावांचे सर्वेक्षण केले. संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना, राजहंस दूध संघ, संगमनेर यांचा औद्योगिक दृष्टिकोनातून अभ्यास केला. जी.पी.एस.द्वारा वाघापूर गावाचा नकाशा तयार करुन जी.आय.एस.च्या आधारे माहिती तयार करण्यात आली. शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले.

## रसायनशास्त्र विभाग

विभागप्रमुख

### प्रा.संजय ताकटे

शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून 'कार्बनी रसायनशास्त्र' पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे द्वितीय वर्ष सुरू करण्यात आले. यु.जी.सी. अंतर्गत प्रथम वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'सर्टिफिकेट कोर्स इन डेअरी ॲण्ड ॲग्रीकल्चर केमिस्ट्री' कोर्स सुरू केला आहे. पुणे विद्यापीठात रसायनशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या ५ जानेवारी ते ७ जानेवारी २०१० इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये प्रा.एस.बी.ताकटे व प्रा.एस.एम.सोनवणे यांनी रिसर्च पेपर्स सादर केले. तसेच प्रा. एस. एम. सोनवणे यांचा पीएच्.डी प्रबंध पुणे विद्यापीठात सादर करण्यात आला.

## एम्.कॉम्. विभाग

विभाग प्रमुख

### प्रा.रामकृष्ण देशमुख

१७ ऑगस्ट २००९ रोजी एम.कॉम विभागास मान्यता मिळून १ सप्टेंबर २००९ पासून सुरुवात झाली. एकूण १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

अभ्यासक्रम

केंद्र संयोजक

**श्री. लक्ष्मीकांत आगलावे**

अनेकांना सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अशा न शिकलेल्या विद्यार्थ्यांसाठी, गृहिणींसाठी उच्च शिक्षण घेण्याची सुविधा महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रात उपलब्ध आहे.

आत्मविश्वास मानवास किती उच्च शिखरावर घेऊन जाऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण आपल्या महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनी सौ. मंगल वाकचौरे- घुले हिने सिध्द केले असून, ही विद्यार्थिनी कौटुंबिक कामासाठी एकटी दुबई येथे जाऊन आली व वारंवार जात आहे. श्रीमती गायकर शुक्रा वामन ही ५५ वर्षे वयाची आदिवासी भागातील महिला पदवीधर झाली.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष कला ५४, द्वितीय वर्ष कला ७९, तृतीय वर्ष कला ७०, वाणिज्य १६ असे एकूण २०९ प्रवेश दिलेले आहेत. पूर्व तयारीच्या ऑक्टोबर २००९ परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागलेला असून, सर्व वर्गातील निकालाची परंपराही उत्तम आहे. या वर्षी सालाबादप्रमाणे वादविवाद, वक्तृत्व, अभ्यासक्रमावर आधारित विविध स्पर्धा, कलागुणांना वाव मिळावा म्हणून रांगोळी, संगीत खुर्ची, अंताक्षरी अशा अनेक स्पर्धांचे आयोजन फेब्रुवारी व मार्च महिन्यात करण्यात आले.

या केंद्रासाठी विविध विषयांचे समंत्रक म्हणून प्रा. डॉ.भास्कर खांडगे, प्रा.सखाराम चासकर, प्रा.भिमाजी पळसकर, प्रा.साहेबराव गायकवाड, प्रा.पी.आर.जगताप, प्रा. रंजना कदम, प्रा.यासीन सय्यद, प्रा.के.एस. गुंजाळ, प्रा. अश्पाक पठाण, प्रा.आर.बी.कर्पे, प्रा.एस.एस.बिराजदार यांनी मार्गदर्शन केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राचे केंद्रप्रमुख मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रसंयोजक श्री.लक्ष्मीकांत आगलावे, सर्व समंत्रक व प्रशासकीय कर्मचारी तसेच सहाय्यक श्री.पंकज गायकर तसेच श्री.सखाराम पथवे, श्री. गणेश वाळुंज, श्री.अमोल वाकचौरे, श्री.किरण नेहे, श्री. सुरेश वाकचौरे, श्री.जयराम जेडगुले व श्री.अरूण शेटे हे कार्यरत आहेत.

### कार्यालय

अधीक्षक

**श्री. चंद्रभान ढवळे**

कनिष्ठ महाविद्यालय, पदवी व पदव्युत्तर तसेच मुक्त विद्यापीठ मिळून आज महाविद्यालयात चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

प्रा.नंदकुमार रासने, प्रा.एम.ए. बारगजे, प्रा.सौ. आर.एम. बारगजे, प्रा.एम.एल. कुडगनुरे, प्रा.ए.डी. पाटील, श्री.पी.एस.नवले हे सहकारी महाविद्यालयाच्या सेवेतून निवृत्त झाले.

कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्यात आले असून, प्रवेश पावती पासून ते महाविद्यालय सोडल्याचा दाखला ही सर्व कागदपत्रे संगणकाच्या सहाय्याने दिली जातात. या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात एम्.ए.(मराठी),एम्.ए.(इंग्रजी), एम्.कॉम्., बी.एस्सी (वाईन टेक्नॉलॉजी) हे अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आले. सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून एम्. कॉम.(बिझिनेस अॅडमिनीस्ट्रेशन) हा नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ व शासन नियमानुसार वेळेत प्रस्ताव सादर केलेले आहेत.

श्री.सचिन चासकर यांनी दिनांक १४ ते १९ डिसेंबर २००९ या कालावधीत पुणे विद्यापीठात 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावरील प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केला. सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयाचे संकेतस्थळ अद्यावत करून महाविद्यालयातील सर्व प्रवेश ऑनलाईन करण्याचा संकल्प आहे.

## वैयक्तिक कामगिरी

### प्रा.यासीन सय्यद, (व्याख्याता, राज्यशास्त्र)

य.च.म.मुक्त विद्यापीठाचा एम्.फिल. पदवी परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. मार्गदर्शक - प्रा.डॉ.शंकरराव चव्हाण, उपप्राचार्य बा.आ.महा. विद्या.पाथर्डी. लघुशोध निबंध विषय - अकोले तालुक्यातील ठाकर आदिवासी जमातीचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग सन - २००१-२००५ .

### प्रा.डॉ.बाबासाहेब देशमुख,

(प्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग)

1) International conference attended at Lucknow, organized by NBRI, Lucknow, during 12 to 14 Nov. 2009 and presented there a research paper titled-Ex-Situ conservation Studies on Endemic, Rare and Ethnomedicinal Plants from Western Ghats of Maharashtra.

2. Research papers Published: Two in International Journals.

i) "Wild Edible Plants used by the Tribes of Akoles tahasil of Ahmednagar District (Ms), India" Ethnobotanical Leaflets 13:1328-36,2009

ii) "Fruits in the wilderness: A Potential of Local Food Resource" International Journal of Pharma and Biosciences No. MS 160-2010/2

3) Participation:

i) Invotation 2009: Research competition organized by University of Pune 19 th & 20th December 2009.

ii) Participation in national, State conference/ workshop.

4) Guidance to student for Avishkar 2009: Research competition organised by University of Pune for college students.

### प्रा.डॉ.सौ.अकीला शेख (प्रमुख, हिंदी विभाग)

१) पुणे विद्यापीठाची पीएच्.डी. गाईडशिप

२) मायनर रिसर्च प्रोजेक्ट परिक्षणासाठी तज्ज्ञ म्हणून नियुक्ती

### श्री.प्रविण घुले

य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिकची ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील एम.फिल.पदवी प्राप्त

### प्रा.डॉ.विजय भगत (व्याख्याता, भुगोल विभाग)

A) Dr.Praveen Saptarshi Best Geography Teacher Award-09 conferred by 'Maharashtra Bhugolshastra Parishad'h, Pune.

B) Recognized as a research guide by the University of Pune for M.Phil. & Ph.D Degrees.

C) Research completed under the guidence : M.Phil. -4

D) Number of M.Phil. Dissertations assessed -6.

E) Worked as a Reviewer for international Journal of Water Resource managment from London.

F) Co-autor of Research paper entitled 'Degraded Land Mapping & Change Detection as evidenced from Remote Sensing Data - A Case Study Rawatsar areas in arid lands of Western Rajasthan' in International Journal of Water & Land Use Managment, (ISSN :0973-9300) Vol.9,(1,2) 127-138.

G) Co-autor of Research paper entitled 'Use of Lands at ETM+ Data for detection and Delineation of areas under Prosopis Juliflora in riverside Zone in the Kopargaon Tahsil of the A'Nagar Dist.' in the State Level Conference MPB Amravati, (Nov-2009)

H) Worked as a resource person in State University Level Conferences & Seminars held in different Universities in Maharashtra

I) Number of participation in Workshops, Seminars & Symposiums-3.

J) Co-investigator of research project undertaken entitled 'Suitability analysis for commercial Kaju plantation in Upper Mula Basin : A GIS & Remote Sensing approach' funded by BCUD, Pune.

## यु.जी.सी. योजना विभाग

**प्रा.संजय ताकटे**

यु.जी.सी. अकराव्या योजनेअंतर्गत मुलींच्या वसतिगृहासाठी मंजूर रूपये एक कोटीचे वसतिगृह महाविद्यालयात साकारणार आहे. या वर्षी विविध उपक्रमांचे पंच्च्याहत्तर लाखांचे प्रस्ताव यु.जी.सी.कडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले. रसायनशास्त्र विभागांतर्गत प्रथम वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'सर्टिफकेट कोर्स इन डेअरी अॅण्ड अॅग्रीकल्चर केमिस्ट्री'चे आयोजन करण्यात आले.

## ग्रंथालय

प्रा. ग्रंथपाल

**श्री.मारूती बोडके**

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाच्या कक्षा वाढत आहेत. याचा विचार करून आपल्या महाविदयालयात कॅसेट्स, सीडीज्, इंटरनेट, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑनलाईन डेटाबेस इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे. यावर्षी रु. २,५८,०२३/- रूपये किंमतीची एकूण २४,१४३ ग्रंथसंपदा व ९२ नियतकालिके, २१ वर्तमानपत्रे, १३२ सीडीज् महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ग्रंथालयात वर्तमानपत्रे, करिअर गायडन्स, बुकबँक सुविधा, संदर्भ सेवा, इंटरनेट सुविधा, बहिःस्थ सभासदांना सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## परीक्षा विभाग

अध्यक्ष

**प्रा.बाळासाहेब देशमुख**

पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक नियमांनुसार प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष कला, वाणिज्य, बीसीए, प्रथम वर्ष, बी.सी.एस्; बी.बी.ए. या वर्गांच्या सत्रांत परीक्षा, पुरवणी सत्रांत परीक्षा व अधिक पुरवणी सत्रांत परीक्षा घेण्यात आल्या.

तसेच प्रथम, द्वितीय, तृतिय वर्ष विज्ञान, एम.ए. हिंदी, राज्यशास्त्र, मराठी आणि इंग्रजी, भूगोल आणि एम.एस्सी रसायनशास्त्र या वर्गांच्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षांचे सर्व प्राध्यापक डॉ.विजय शेडगे, प्रा.सचिन पाळंदे, प्रा.अशोक दातीर, डॉ. एस. बी. खेमनर, प्रा.ए.के. पठाण, श्री.मधुकर मंडलीक, श्री.साहेबराव पडवळ, श्री. बाळासाहेब अस्वले, श्री.दत्ताराम रूपवते, श्री.हेमंत सोनवणे यांचे सहकार्य लाभले.

## शैक्षणिक व संशोधन विभाग

समन्वयक

**प्रा.डॉ.बाबासाहेब देशमुख**

पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने सन २००९ ते २०१० या वर्षापासून शैक्षणिक व संशोधन समन्वय योजना सुरू केली आहे.

या शैक्षणिक वर्षात विविध विभागाअंतर्गत व एकूण १४ प्रस्ताव पुणे विद्यापीठाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावापैकी इतिहास, वनस्पतीशास्त्र, गणित व रसायनशास्त्र विभाग राष्ट्रीय चर्चासत्र व कार्यशाळेसाठी एकूण दोन लाख पंचवीस हजार रूपये मंजूर झाले आहेत. तसेच प्रा.डॉ.बाबासाहेब देशमुख, प्रा.अशोक दातीर, प्रा.किरण जाधव, प्रा.डॉ.विजय भगत यांचे संशोधन प्रकल्पास मंजूरी मिळाली असून, संशोधनाचे काम चालू आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध ठिकाणी राष्ट्रीय चर्चासत्रात व कार्यशाळेत आपला सहभाग नोंदविला आहे.

# सामाजिक समता मंडळ : उद्घाटन




उद्घाटक
मा.श्री.निफाडकर
यांचे सानंद स्वागत



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा.श्री.निफाडकर

लक्षपूर्वक ऐकणारे उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी






मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील
अध्यक्ष,अ.ता.ए.सो.

प्रा.बाळासाहेब मेहेत्रे,
अध्यक्ष,सामाजिक समता मंडळ

# विद्यापीठस्तरीय चर्चासत्र : राज्यशास्त्र विभाग



१) प्रा.अभिमन्यु केदार विभाग प्रमुख,(प्रास्ताविक)

२) प्राचार्य रमेशचंद्र खांडगे (स्वागत)

३) मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील अध्यक्ष, अ.ता.ए.सो. (अध्यक्षीय भाषण)

सहभागी प्राध्यापक व विद्यार्थी





१) प्रा.डॉ.अलीम वकील (मार्गदर्शक)

२) प्रा.यासीन सय्यद (मार्गदर्शक)

३) उद्घाटक प्रा.डॉ.सौ.सोन खासकर अध्यक्षा, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ

# राष्ट्रीय चर्चासत्र - इतिहास




Prin. Rameshchandra Khandage....
Welcome Speech




Publication of the
Souvenir......




Shri Kiran Jadhav :
Organizing Secretary



Audience &
Participats......





# विद्यार्थी मंडळ पारंपारिक दिवस













# अहवाल
# व
# विशेष कामगिरी



२००८-२००९

**कनिष्ठ महाविद्यालय अहवाल समिती**

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

प्रा.गोरक्ष शिरसाट (उपप्राचार्य)

प्रा.डॉ.भास्कर खांडगे (पर्यविक्षक)

प्रा.ओंकार राठी (शब्दांकन व मांडणी)

## विद्यार्थी मंडळ

अध्यक्ष

**प्रा.विवेक वाकचौरे**

विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन मा.इंद्रजीत देशमुख साहेब, उपायुक्त, जलस्वराज्य प्रकल्प पुणे यांच्या शुभहस्ते व संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कनिष्ठ महाविद्यालयाचा जी.एस. श्री.ज्ञानेश्वर अवचिते, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.स्मिता गंभीरे व विद्यार्थी मंडळाच्या सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

विद्यार्थी मंडळाने वर्षभर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला, गुण, कौशल्यांना वाव देण्यासाठी व विविध गोष्टींच्या जाणीव जागृतीसाठी खालील विविध उपक्रम घेतले.

### गुरुपौर्णिमा :-

आद्य गुरु महर्षी व्यास यांच्या जन्मदिवसानिमित्त गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. सर्व वर्गप्रतिनिधींनी शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन अभिवादन केले.

### स्वाईन फ्ल्यू जाणीव जागृती :-

जुलै, ऑगस्ट महिन्यात स्वाईन फ्ल्यू या आजाराने महाराष्ट्रासह देशभर एक प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण केले होते. मा.प्राचार्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांसाठी 'स्वाईन फ्ल्यू' यावर संगमनेर येथील डॉ.राजेंद्र खताहे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व स्थानिक 'आज दिनांक' या वृत्तवाहिनीवरुन खरी वैद्यकीय माहिती अकोलेकरांच्या घराघरात पोहोचली.

### विद्यार्थी शिक्षक दिन :-

५ सप्टेंबर या दिवशी दिन साजरा करण्यात आला. १२५ विद्यार्थी शिक्षक-शिक्षिकांनी यामध्ये भाग घेऊन आपापले विषय शिकविण्याचे काम केले. अनुभव कथनाने शिक्षकदिनाची सांगता झाली.

### वैद्यकीय उपचारासाठी मदत :-

संदीप पंढरीनाथ तळपाडे या १५ वर्षांच्या मुलास 'अप्लास्टीक ॲनिमिया' सारखा दुर्धर आजार झाला. त्याच्या पालकांच्या विनंतीवरुन कनिष्ठ महाविद्यालयातर्फे रु.५०००/- (रु.पाच हजार) ची आर्थिक मदत गोळा करुन देण्यात आली.

### शहिदांना श्रद्धांजली अर्पण -

दि.२६/११/२००८ च्या मुंबई वरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ महाविद्यालयात शहीद स्मारक उभारण्यात आले आहे. २६/११/२००९ रोजी शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तालुक्याचे आमदार व संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा.मधुकरराव पिचड यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहण्यात आले. संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी यावेळेस उपस्थित होते.

नोव्हेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात वाहून जाणाऱ्या १२ लोकांचे प्राणी होनाजी वाजे यांनी वाचविले. म्हणून श्री.होनाजी वाजे, आम्लेश्वर विद्यालय, आंभोळ येथील कर्मचाऱ्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

### विशेष दिवस -

विद्यार्थिनींसाठी 'सारी डे' व सर्व विद्यार्थ्यांसाठी 'पारंपरिक वेशभूषा दिवस' साजरा करण्यात आला. संस्कृती, परंपरा व विविध चालीरितींचे दर्शन या निमित्ताने झाले.

***

## कलामंडळ

अध्यक्ष

**प्रा.बाळासाहेब शिंदे**

कला मंडळाचे उद्घाटन मा.ॲड. अरुण आहेर यांचे शुभहस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष मा.ॲड.वसंतराव मनकर यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. याप्रसंगी प्रा.लक्ष्मणराव देशपांडे लिखित 'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री प्रयोग पाहुण्यांनी सादर करुन

उपस्थितांना भारावून टाकले.

कला मंडळाच्या मार्फत मराठी, हिंदी गीतगायन, अभिनय, वाद्यवादन स्पर्धा, मेहंदी व रांगोळी रेखाटन या वार्षिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त कनिष्ठ महाविद्यालयाचा विविध गुणदर्शन हा स्वतंत्र कार्यक्रम घेण्यात आला. तसेच रत्नाकर मतकरी लिखित 'घर तिघांचं हवं' हे नाटक प्रा.बाळासाहेब शिंदे व त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. प्रा.ओंकार राठी, प्रा.अशोक कडलग, प्रा.तानाजी जाधव व प्रा.विवेक वाकचौरे यांनीविशेष परिश्रम घेऊन कला मंडळाचे सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यास सहकार्य केले.

## वाङ्मय मंडळ

अध्यक्ष

**प्रा.आत्माराम काळे**

कथा, कविता, निबंध लेखनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी वाङ्मय मंडळाने विविध स्पर्धांचे आयोजन करुन उपलब्ध करुन दिली.

जिल्हा परिषद अहमदनगर व श्री रामकृष्ण मिशन संयुक्त राष्ट्र माहिती केंद्राच्या सहयोगाने अखिल भारतीय निबंधलेखन उपक्रमात महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांचे निबंध निवड करुन पाठविण्यात आले.

प्रतिबिंब फोटो स्टुडिओ, अकोले यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत सात विद्यार्थ्यांचे निबंध निवड करुन पाठविण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त कविता, कथा, निबंधलेखन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रा.ओंकार राठी यांनी सहकार्य केले. विविध स्पर्धांच्या परिक्षणासाठी प्रा.बाळासाहेब शेटे, प्रा.अशोक कडलग यांचे सहकार्य लाभले.

## वादविवाद मंडळ

अध्यक्ष

**प्रा.सखाराम चासकर**

वादविवाद मंडळातर्फे वादविवाद, वक्तृत्त्व स्पर्धा घेण्यात आल्या. प्रा.महेश उगले यांचे सहकार्य यासाठी मिळाले. प्रा.बिराजदार व प्राध्यापिका सौ.नंदा डफाळ यांनी परीक्षक म्हणून काम केले.

## परीक्षा विभाग

अध्यक्ष

**प्रा.डी.एम्.वाकळे**

शैक्षणिक वर्षात दोन घटक चाचण्या, सहामाही, सराव परीक्षा, प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षांचे योग्य नियोजन करण्यात आले. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रा.अनंतराव फापाळे, प्रा.बापूसाहेब आवारी, प्रा.संजय लांडगे, प्रा.देविदास चौधरी, प्रा.जी.डी.साबळे व प्राध्यापिका सौ.नंदा डफाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर)

कार्यक्रम अधिकारी

**प्रा.गणपत नवले**

कनिष्ठ महाविद्यालयातील निवडक १०० विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून निवड करण्यात आली. रा.से.यो. च्या उद्दिष्टांनुसार व नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालय परिसराची स्वच्छता वेळोवेळी करण्यात आली. सेवाभाव व त्याची प्रत्यक्ष अनुभूती विविध उपक्रमातून देण्यात आली. एड्स जनजागृती, वयात येताना, स्वाईन फ्ल्यू : लक्षणे व उपचार आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

फेब्रुवारी २०१० च्या पहिल्या आठवड्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर वाघापूर, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे घेण्यात आले.

प्रा.बाळासाहेब पवार, प्रा.डॉ.सुनील शिंदे, प्रा.रुपाली रासने, प्रा.नंदा डफाळ यांचे सहकार्य त्यांना वर्षभर लाभले.

## विज्ञान मंडळ

अध्यक्ष

**प्रा.अशोक कडलग**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी व पर्यावरणाच्या विविध समस्यांची जाणीव जागृतीसाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विज्ञानाशी निवडित विषयांवर निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यासाठी प्रा.चांगदेव डोंगरे व प्रा.गुलाब देशमुख यांनी सहकार्य केले.

स्पर्धेच्या परीक्षणाचे काम प्रा.बाळासाहेब शेटे, डॉ.सुनील शिंदे, प्रा.ओंकार राठी, प्रा.विवेक वाकचौरे व प्रा.तानाजी जाधव यांनी केले. तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

## वेळापत्रक

अध्यक्ष

**प्रा.डॉ.अनिरुद्ध वांगडे**

कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व वर्गांचे, सर्व विषयांचे वेळापत्रक तयार करण्यासाठी प्रा.सखाराम चासकर यांनी सहकार्य केले.

## नियतकालिक विभाग

अध्यक्ष

**प्रा.डॉ.सुनील शिंदे**

शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता नियतकालिक विभागाचे काम प्रगतीपथावर आहे. नियतकालिकासाठी प्रा.ओंकार राठी, प्रा.बाळासाहेब शेटे, प्रा.सौ.नंदा डफाळ व प्रा.रुपाली रासने यांचे सहकार्य लाभले.

## वाणिज्य मंडळ

अध्यक्ष

**प्रा.गणपतराव हासे**

वाणिज्य मंडळामार्फत निबंधस्पर्धा घेण्यात आली. यासाठी प्रा.एस.एस. बिराजदार यांनी सहकार्य केले.

## सामाजिक समता मंडळ

अध्यक्ष

**प्रा.राजेंद्र कर्पे**

मंडळाच्यामार्फत निबंधस्पर्धा घेण्यात आली. निबंधाच्या परीक्षणाचे काम प्रा.ओंकार राठी यांनी केले.

## प्रवेश परीक्षा

अध्यक्ष

**प्रा.विवेक वाकचौरे**

इ.१२ वी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता विविध परीक्षा द्याव्या लागतात. या प्रवेश परीक्षांबाबतची सर्व माहिती प्रवेश अर्ज भरण्यापासून ते परीक्षा देण्यापर्यंतचे मार्गदर्शन या विभागामार्फत केले जाते.

मे २००९ एमएचटी - सीईटी परीक्षेस महाविद्यालयातून २७८ विद्यार्थी बसले. त्यापैकी ३८ विद्यार्थ्यांना इंजिनिअरींग व १० विद्यार्थ्यांना फार्मसीच्या विविध शाखांमध्ये प्रवेश मिळाला.

पुणे येथील 'डिपर' ही संस्था महाराष्ट्र शासनाच्या एमएचटी-सीईटी परीक्षेच्या धर्तीवर डीसीटी नावाची परीक्षा होते. १० जानेवारी २०१० या दिवशी झालेल्या डीसीटी परीक्षेस महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर २७१ विद्यार्थ्यांनी या वर्षी परीक्षा दिली.

एमएचटी-सीईटी च्या वर्गास प्रा.अशोक कडलग, प्रा.बाबासाहेब शेवाळे, प्रा.भिमाजी पळसकर, प्रा.विवेक वाकचौरे, प्रा.चांगदेव डोंगरे, प्रा.संभाजी गायकवाड व प्राध्यापिका सौ.मनिषा घोलप, प्रा.डावखर नियमितपणे मार्गदर्शन करीत आहेत.

## विशेष स्पर्धा परीक्षा

अध्यक्ष

**प्रा.भिमाजी पळसकर**

राष्ट्रीय स्तरावर विज्ञान व आंतरराष्ट्रीय स्तरावर गणित या विषयाची ऑलिंपियाड परीक्षा राष्ट्रीय विज्ञान संस्था (दिल्ली) घेते. इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान वर्गातील ६७ विद्यार्थी परीक्षेस बसले. मागील वर्षी महाविद्यालयातील तीन विद्यार्थिनी जिल्हास्तरावर निवड झाली. या विशेष स्पर्धा परीक्षेसाठी प्रा.चांगदेव डोंगरे, प्रा.संभाजी गायकवाड व विज्ञान वर्गास शिकविणाऱ्या सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

## परिसर विकास मंडळ

अध्यक्ष

**प्रा.बाबासाहेब शेवाळे**

महाविद्यालय परिसरातची स्वच्छता, वृक्षारोपण विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आले. वनस्पतीशास्त्र उद्यानातील झाडांची निगा ठेवण्यात आली. यासाठी प्रा.जी.डी.साबळे यांनी सहकार्य केले.

## विद्यार्थिनी विकास मंडळ

अध्यक्षा

**प्रा.सौ.मनिषा घोलप**

मंडळाच्या मार्फत निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.सुनील शिंदे यांनी केले. प्राध्यापिका रुपाली रासने, प्रा.नंदा डफाळ यांनी सहकार्य केले.

## सहल विभाग

अध्यक्ष

**प्रा.तानाजी जाधव**

सहल विभागाच्या वतीने कोकण दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. प्राध्यापिका सौ.मनिषा घोलप यांनी या कामी सहकार्य केले.

## शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा समिती

- अध्यक्ष -

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

कार्यकारी अध्यक्ष -

प्रा.नंदलाल काळन

- सदस्य -

प्रा.योगेश उगले, प्रा.बाळासाहेब गोर्डे, प्रा.राजेंद्र कर्पे, प्रा.सतीश काळे, प्रा.नंदा डफाळ, प्रा.रुपाली रासने

विद्यार्थी सदस्य

कु.शेख जबिन अरिफ

या शैक्षणिक वर्गात विविध खेळांचे संघ तयार करुन तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी पाठविण्यात आले. राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व प्राविण्य मिळविलेले खेळाडू

**टग ऑफ वॉर (रस्सीखेच) :-**

नंदूरबार येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतून ४४० कि.ग्रॅ. व ४८० कि.ग्रॅ. वजनी गटातून दोन खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली.

राजस्थान 'कोटा' या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडू

१) कु.वैद्य पल्लवी बादशहा

२) कु.उकली शुभा भिमा

नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतून राष्ट्रीय अजिंक्यपद व फेडरेशन कप स्पर्धेसाठी चार खेळाडूंची निवड झाली.

राष्ट्रीय टग ऑफ वॉर अजिंक्यपद स्पर्धा आग्रा येथे झाली या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झालेले विद्यार्थी.

१) पथवे विजय जयराम

२) वाघमारे अक्षय भास्कर

८ वी फेडरेशन कप टग ऑफ वॉर नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धा दिल्ली येथे झाली. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झालेले विद्यार्थी.

१) दिवटे सागर सुनील

२) शेख खालिद दिलावर

या स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ रौप्यपदक विजेता ठरला. राष्ट्रीय स्पर्धेतील आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंना रौप्यपदकाने सन्मानित करण्यात आले.

**नेटबॉल -**

१९ वर्षे वयोगट ज्युनिअर मुले-मुली यांची राज्यस्तरीय स्पर्धा अकोले, अहमदनगर येथे झाली. राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात दोन विद्यार्थ्यांची निवड झाली.

नाशिक येथे झालेल्या राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

मुले - देशमुख गौरव दिगंबर

मुली - कु.शेख जबिन अरिफ

**कराटे -**

धनकवडी, पुणे येथे झालेल्या खुल्या राष्ट्रीय चॅम्पियन स्पर्धेत (४१ ते ४५ कि.ग्रॅ.वजनगट) सहभागी झालेला खेळाडू - खाडे शेखर धोंडिराम.

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग व प्राविण्य मिळविलेले खेळाडू

**टग ऑफ वॉर (रस्सीखेच) -**

भाऊसाहेब संतुजी थोरात संगमनेर येथे झालेल्या (१९ वर्षे वयोगट मुली) जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

| | | |
|---|---|---|
| १) कु. वैद्य पल्लवी बादशहा | : | ४४० कि.ग्रॅ. वजन गट |
| २) कु. वाकचौरे स्वाती सुभाष | : | ४४० कि.ग्रॅ. वजन गट |
| ३) कु. गिते अनिता गणपत | : | ४४० कि.ग्रॅ. वजन गट |
| ४) कु. उकली शुभा भिमा | : | ४४० कि.ग्रॅ. वजन गट |

११ वी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा (मुली) नंदूरबार येथे झाली. ४४० कि.ग्रॅ. वजन गटात अहमदनगर जिल्हा संघाने सुवर्णपदक व विजेतेपदाची ट्रॉफी मिळवली. सब ज्युनिअर १७ व १९ वर्षेवयोगट (मुले) जिल्हास्तरीय स्पर्धा मालपाणी विद्यालय संगमनेर येथे झाल्या. या स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

१७ वर्षाखालील ४४० कि.ग्रॅ. व ४८० कि.ग्रॅ. वजनगट

१) गोर्डे नंदू बाळासाहेब २) वाकचौरे तुषार राधाकिसन
३) पथवे विजय जयराम ४) वाघमारे अक्षय भास्कर
५) वाळुंज सुनील भास्कर ६) घोडके अवधूत काशिनाथ

१९ वर्षे वयोगट ५२० कि.ग्रॅ. व ५६० कि.ग्रॅ. वजनगट

१) वाकचौरे सुचित शिवाजी २) दिवटे सागर सुनील
३) झोडगे किरण गोमा ४) वाकचौरे ज्ञानेश्वर अशोक
५) गभाले दिनेश मारुती ६) शेटे वैभव भरत,
७) भालेराव अजिंक्य अनंत ८) शेख खालिद दिलावर,
९) कानवडे राहुल भाऊसाहेब

११ वी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा (मुले) नांदेड येथे झाली. या स्पर्धेत अहमदनगर जिल्हा संघाने १७ वर्षा आतील ४४० कि.ग्रॅ. वजनगटात सुवर्णपदक व ट्रॉफीचा मान मिळवला आणि १९ वर्षाआतील ५६० कि.ग्रॅ वजनगटात ब्राँझपदक मिळविले.

संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा झाली. या स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघाची निवड करण्यात आली. या संघात महाविद्यालयातील निवड झालेले खेळाडू.

**६०० कि.ग्रॅ. वजनगट**

१) मंडलिक ओमप्रकाश २) मंडलिक अनिल

**६८० कि.ग्रॅ. वजनगट**

१) मोरे प्रविण सुरेश

११ वी राज्यस्तरीय पुरुष टग ऑफ वॉर स्पर्धा चिखली, जि.बुलढाणा येथे झाली. या स्पर्धेत ६८० कि.ग्रॅ. वजनगट स्पर्धेत अहमदनगर जिल्हा संघाने विजेतेपद मिळविले. यामध्ये मोरे प्रविण सुरेश या खेळाडूने सुवर्णपदक मिळविले.

**हॅण्डबॉल -**

महाराष्ट्र स्टेट हॅण्डबॉल असोसिएशनच्या वतीने ३२ वी ज्युनिअर स्टेट (मुली) चॅम्पियनशिप स्पर्धा भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक येथे संपन्न झाली. या स्पर्धेत अहमदनगर जिल्हा संघात समावेश असणारे खेळाडू.

१९ वर्षे वयोगट - मुली

१) कु.शेख जबिन अरिफ, २) कु.पिचड मोनिका सदाशिव ३) कु. घिगे गीतांजली भिमा, ४) कु.भळगट पायल भरत, ५) कु. कानवडे माया रमेश, ६) कु.गाडे प्राजक्ता शिवाजी

३२ वी ज्युनिअर स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धा (मुले १९ वर्षेवयोगट) चाळीसगाव येथे झाली. या स्पर्धेसाठी जिल्हासंघात निवड झालेले खेळाडू

१) भुजबळ अक्षय भाऊसाहेब

२) गायकर शरद राधाकिसन

३) भळगट पुष्पक अशोक

३८ वी सिनिअर स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धा अहमदपूर जि.लातूर येथे झाली. या स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड झालेले खेळाडू.

१) दिवटे सागर सुनील, २) शेख खालिद दिलावर, ३) भळगट पुष्पक अशोक, ४) पवार विजय बाबुराव

महाराष्ट्र हॅण्डबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय महिला अजिंक्यपद स्पर्धा स्पोर्टस् अॅथॉरिटी ऑफ इंडिया, कांदिवली - मुंबई येथे झाल्या. या स्पर्धेसाठी जिल्हासंघात निवड झालेले खेळाडू.

१) कु.शेख जबिन अरिफ,

२) कु.गाडे प्राजक्ता अशोक

श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि.पुणे येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धेत उपविजयी झालेल्या संघातून राज्यस्तरीय निवड स्पर्धेसाठी

१) कु.शेख जबिन अरिफ

२) कु. गाडे प्राजक्ता शिवाजी

याची निवड झाली.

आर. आर. विद्यालय, भोर, जि.पुणे येथे झालेल्या पुणे विभागीय महिला हॅण्डबॉल स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड - कु. कानवडे माया रमेश ही राज्यस्तरीय स्पर्धा चंद्रपूर येथे संपन्न झाली.

## टेनिकॉईट (रिंग टेनिस) :-

महाराष्ट्र टेनिकॉईट असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धा (१९ वर्षेवयोगट-मुली) सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल, संगमनेर येथे संपन्न झाली. या स्पर्धेसाठी जिल्हा संघात कु. वाकचौरे प्राजक्ता संजय हिची निवड झाली.

## राज्यस्तरीय सिनिअर टेनिकॉईट स्पर्धा

(वरिष्ट गट - मुले) श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी-पुणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेसाठी पवार विजय बाबुराव याची जिल्हा संघात निवड झाली.

## नेटबॉल :-

महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय स्पर्धा जालना येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात पुढील खेळाडूंची निवड झाली.

पुरुष गट -

१) घोडके अवधूत काशिनाथ,

२) दिवटे सागर सुनील

३) भालेराव अजिंक्य आनंद

४) पवार विजय बाबुराव

५) शेख खालिद दिलावर

महिला गट -

१) कु. शेख जबिन अरिफ,

२) कु. पिचड मोनिका सदाशिव

१९ वर्षेवयोगट ज्युनिअर मुले व मुली यांची राज्यस्तरीय ज्युनिअर नेटबॉल अजिंक्यपद स्पर्धा अकोले, महाविद्यालय, अकोले येथे झाली. या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात निवड झालेले खेळाडू -

मुली - १) कु. शेख जबिन अरिफ

२) कु. कानवडे माया रमेश

३) कु. घिगे गीतांजली भिमा

४) कु. पिचड मोनिका सदाशिव

५) कु. नवले पूजा सुनील

६) कु. गाडे प्राजक्ता शिवाजी

७) कु. भळगट पायल भरत

मुले - १) देशमुख गौरव दिगंबर

२) घोडके अवधूत काशिनाथ

३) दिवटे सागर सुनील,

४) रांधवणे आकाश गोवर्धन

५) शेख खालिद दिलावर

६) भालेराव अजिंक्य आनंद

या स्पर्धेमध्ये अहमदनगर जिल्हा संघाने (मुली) उपविजेतेपद मिळवून रौप्यपदक मिळविले.

**ॲथेलेटिक्स :-**

असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय मैदानी स्पर्धा सनस मैदान, पुणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हासंघात निवड झालेले खेळाडू.

कु. गजे सुजाता भाऊसाहेब - उंच उडी
गभाले दिनेश मारुती - ४०० मी. हर्डल्स (अडथळा)

**पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू -**

**हॅण्डबॉल -**

अशोकनगर, ता.श्रीरामपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धेत १९ वर्षाआतील मुली व महिला अशा दोन्ही गटात महाविद्यालयाने विजेतेपद मिळविले. या दोन्ही संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्ह्यातर्फे निवड झाली. निवड झालेल्या संघातील खेळाडू.

१) कु. शेख जबिन अरिफ
२) कु. पिचड मोनिका सदाशिव
३) कु. घिगे गीतांजली भिमा
४) कु. भळगट पायल भरत
५) कु. गाडे प्राजक्ता शिवाजी
६) कु. कानवडे माया रमेश
७) कु. नवले पूजा सुनील
८) कु. मडके दिपीका संजीव
९) कु. वाकचौरे प्रियंका सुधाकर
१०) कु. धनवटे पूजा नानासाहेब
११) कु. नाईकवाडी मोनिका बाजीराव
१२) कु. देशमुख भाग्यश्री बाळासाहेब

वरील संघाने उपविजेतेपद प्राप्त केले.

**ॲथलेटिक्स -**

अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

१) कु. गजे सुजाता भाऊसाहेब - उंच उडी,
२) कु.वाकचौरे प्रणाली बापूसाहेब - थाळीफेक

**बुध्दिबळ -**

टिळक नगर, ता. श्रीरामपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली खेळाडू - कु. वैद्य प्रियंका अर्जुन

**बॅडमिंटन -**

घुलेवाडी, ता.संगमनेर येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड- गोंदके अक्षय लक्ष्मण.

**मल्लखांब -**

अहमदनगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड - टपाल पराग बी.

जिल्हास्तरीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेले संघ व खेळाडू

**ॲथलेटिक्स :-** तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत प्राविण्य मिळविलेले व जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

१) गोंदके अक्षय लक्ष्मण - ४०० मी. धावणे (प्रथम व रिले प्रथम क्रमांक)
२) झोडगे किरण गामा - ८०० मी. धावणे - प्रथम क्रमांक, १५०० मी. धावणे - द्वितीय क्रमांक, ४×१०० मी.रिले - प्रथम क्रमांक
३) गभाले दिनेश मारुती - १०० मी. धावणे - प्रथम क्रमांक
४) देशमुख गौरव दिगंबर - लांब उडी व उंच उडी - प्रथम क्रमांक
५) वाकचौरे तुषार राधाकिसन - भालाफेक - प्रथम क्रमांक, रिले प्रथम क्रमांक
६) नाईकवाडी प्रविण ज्ञानेश्वर - भालाफेक - द्वितीय क्रमांक, रिले प्रथम क्रमांक
७) भुजबळ अक्षय भाऊसाहेब - उंच उडी - द्वितीय क्रमांक

८) कु. गजे सुजाता भाऊसाहेब -
उंच उडी - प्रथम क्रमांक
९) कु. वाकचौरे प्रणाली बापूसाहेब -
थाळीफेक - प्रथम क्रमांक
१०) कु. वाकचौरे प्राजक्ता संजय -
गोळाफेक - प्रथम क्रमांक

**बुद्धिबळ -**

टिळकनगर, ता.श्रीरामपूर येथे शालेय बुद्धिबळ स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत सहभागी खेळाडू.

मुले -
१) मुंढे प्रदिप संपत,
२) तळपाडे संकेत किसन,
३) शहा पियाल प्रशांतकुमार
४) गोंदके विक्रम सुरेश
५) पथवे विजय जयराम

मुली -
१) कु. वैद्य प्रियंका अर्जुन
२) कु. जाधव स्नेहल किसन

**कुस्ती -**

राजूर, ता.अकोले येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेतून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला खेळाडू - बोऱ्हाडे मोहन तानाजी.

**बॅडमिन्टन -**

घुलेवाडी, ता.संगमनेर येथे झालेल्या जिल्हा-स्तरीय स्पर्धेत सहभागी खेळाडू -
१) सासवडे अंकित देविदास,
२) गोंदके अक्षय लक्ष्मण,
३) ढगे प्रशांत सत्यवान,
४) शेळके विनोद नवनाथ

**तायक्वांदो -**

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल, संगमनेर येथे झालेल्या स्पर्धेतील सहभागी खेळाडू
१) खाडे शंकर धोंडीराम,
२) जगदाळे कृष्णा राजेंद्र

**मल्लखांब -**

अहमदनगर येथे झालेल्या स्पर्धेत सहभागी खेळाडू - १) पाल पराग बी.
२) जगताप एन.एस.

**थ्रो बॉल -**

कोपरगाव येथे झालेल्या शालेय स्पर्धेत सहभागी संघातील खेळाडू -
१) वाकचौरे प्रशांत बाळासाहेब
२) भांगरे दिलीप यशवंत
३) शेटे वैभव भरत
४) झोडगे नवनाथ भाऊसाहेब
५) शेणकर सिद्धेश संदीप
६) पवार अजित रमेश,
७) सगणे योगेश घनश्याम
८) कवडे सोमनाथ विलास
९) वाकचौरे निलेश भारत
१०) वाकचौरे प्रशांत दिलीप
११) नाईकवाडी प्रविण ज्ञानेश्वर
१२) मालुंजकर स्वप्निल रामदास

**तालुकास्तरीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेले संघ व खेळाडू**

**कुस्ती -**

राजूर, ता.अकोले येथे झालेल्या स्पर्धेत प्राविण्य मिळविलेले खेळाडू.
१) बोऱ्हाडे मोहन तानाजी - प्रथम क्रमांक,
२) अत्तार मुजफिल चाँदसाहब - द्वितीय क्रमांक

**खो-खो -**

अगस्ती महाविद्यालय, अकोले येथे झालेल्या स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ उपविजयी झाला.

**कबड्डी -**

महाविद्यालयाच्या संघाने या स्पर्धेत उपविजेते पद मिळविले. याशिवाय विविध वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन नेहेमीप्रमाणे करण्यात आले.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सर्व

सन्माननीय विश्वस्त पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, वेगवेगळ्या समारंभासाठी आलेले मान्यवर अतिथी, तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी गावातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी आम्हास वर्षभरात वेळोवेळी जे मार्गदर्शन केले व आमच्या कार्याला दिशा दिली त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

## उल्लेखनीय नोंदी

### प्रा.डॉ. सुनील शिंदे

१) रुथबाई हिवाळे स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा - अहमदनगर महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक, राष्ट्रसेवा दल अकोले तालुका व सौरभ प्रतिष्ठान आयोजित निबंधलेखन स्पर्धेचे परीक्षक.

२) पद्मगंधा प्रकाशनाच्या 'लोकगंगा' ग्रंथात 'जाहिरात आणि लोकसाहित्य : परस्पर संबंध' शीर्षकाचा संशोधनपर लेख.ॐ गुरुदेव मासिकात वर्षभर 'ध्यान' या विषयावर लेखमाला, 'झंजावती व्यक्तिमत्व लोकशाहीर अणणाभाऊ साठे' शीर्षकाचा लेख दैनिक 'सकाळ' मध्ये प्रसिद्ध, 'सामाजिक चिंतनाचे द्रष्टेपण पेलणारे करारी व्यक्तिमत्व : सावित्रीबाई फुले' शीर्षकाचा लेख रविवार लोकमत पुरवणीत प्रसिद्ध, 'अकोले तालुक्याचा शिल्पसाज' शीर्षकाचा लेख साप्ताहिक 'प्रवराकाठ' मध्ये प्रसिद्ध.

३) समर्थ कन्या प्रशाला, ज्यु.कॉलेज राजूर येथे रा.से. योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरात 'श्रम आणि संस्कार' विषयावर व्याख्यान, समता परिषद, प्रवरा पतसंस्था, सावित्रीबाई वाचनालय, अकोले, हिवरगाव आंबरे प्राथमिक व माध्यमिक विद्यालय सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात व्याख्याने.

### प्रा. नंदलाल काळण

१) महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशनने राष्ट्रीय सिनिअर महिला व पुरुष नेटबॉल स्पर्धा जालना येथे घेतल्या. राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या निवड समितीत सदस्य.

२) टग ऑफ वॉर (रस्सीखेच) - नंदुरबार येथील स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धा (मुली), नांदेड येथील स्टेट चॅम्पियन स्पर्धा (पुरुष) येथे अहमदनगर जिल्हा टग ऑफ वॉर असोसिएशन तर्फे अहमदनगर जिल्हा संघाचा मार्गदर्शक म्हणून निवड. नंदरबार (मुली), नांदेड (मुले-४४० कि.ग्रॅ.वजनगट) व चिखली, जि.बुलढाणा येथील तीनही स्पर्धेत संघाने सुवर्णपदक मिळविले.

३) हॅण्डबॉल - भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक येथील ३२ व्या ज्युनिअर महाराष्ट्र स्टेट हॅण्डबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा (मुली), स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडिया, कांदिवली, मुंबई येथील ३८ व्या महाराष्ट्र स्टेट हॅण्डबॉल स्पर्धा (मुली) महात्मा गांधी विद्यालय अहमदपूर, जि.लातूर येथील स्पर्धेत (पुरूष) अहमदनगर जिल्हा हॅण्डबॉल असोसिएशन तर्फे जिल्हा संघाचा मार्गदर्शक म्हणून निवड.

४) नेटबॉल - २ री सब ज्युनिअर महाराष्ट्र स्टेट नेटबॉल चॅम्पियन स्पर्धेसाठी (मुले) अहमदनगर जिल्हा संघाचा व्यवस्थापक म्हणून निवड.

५) टेनिकॉईट - शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे झालेल्या ३४ व्या सिनिअर टेनिकॉईट चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी जिल्हा संघाचा मार्गदर्शक म्हणून निवड.

## यशवंत हो..! गुणवंत हो...!

कमलकिशोर सतीशचंद्र राठी हा आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी नोव्हेंबर २००९ मध्ये झालेल्या सी.ए. परीक्षेत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाला. महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन!

अत्यंत कष्टाने व जिद्दीने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करीत असतानाच सी.ए.च्या परीक्षेची तयारी त्याने सुरू केली. सी.ए. इंटरच्या परीक्षेत त्याने राष्ट्रीय पातळीवर ४९ वा क्रमांक मिळविला.

सध्या कीर्तने पंडीत असोसिएट, पुणे येथे तो कार्यरत आहे. बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी करण्यापेक्षा अकोल्यात स्वतंत्र प्रॅक्टिस करण्याचा मनोदय त्याने व्यक्त केला.

***